# महाराष्ट्र विधानसभा

## दुसरे अधिवेशन, २०२०

**तारांकित प्रश्नोत्तरांची यादी**

**गुरुवार, दिनांक १२ मार्च, २०२० / फाल्गुन २२, १९४१ ( शके )**

| | |
|---|---|
| **(१) उद्योग, खनिकर्म, मराठी भाषा मंत्री** | |
| **(२) कामगार, राज्य उत्पादन शुल्क मंत्री** | |
| **(३) ऊर्जा मंत्री** | |
| **(४) बहुजन कल्याण, खार जमिनी विकास, आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन मंत्री** | **यांचे प्रभारी विभाग** |
| **(५) वने, भूकंप पुनर्वसन मंत्री** | |
| **(६) आदिवासी विकास मंत्री** | |
| **(७) सहकार, पणन मंत्री** | |
| **(८) सामाजिक न्याय व विशेष सहाय्य मंत्री** | |

**प्रश्नांची एकूण संख्या - ३०**

### लोनाड (ता.भिवंडी, जि.ठाणे) येथे वृक्ष तोड करुन अनधिकृत बांधकाम केल्याबाबत

**(१) * २३५ श्री.महेश चौघुले (भिवंडी पश्चिम) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) लोनाड (ता.भिवंडी, जि.ठाणे) येथील सर्व्हे क्रमांक २३/ब या ठिकाणी हजारो वृक्षांची तोड करून आरसीसी स्वरुपाचे संरक्षण भिंतीचे अनधिकृत बांधकाम गल्फ ऑइल कॉर्पोरेशन लि. मुंबई यांनी केल्याप्रकरणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी मा.मुख्यमंत्री, मा.महसूल मंत्री, मा.वन मंत्री व जिल्हाधिकारी, ठाणे यांच्याकडे कारवाई करण्याची मागणी माहे ऑगस्ट, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महसूल विभागाकडून सन २००७ मध्ये कंपनीच्या नावे असलेल्या सर्व्हे क्रमांक २३/ब च्या सात बारा उताऱ्यावर इतर हक्कांमध्ये केंद्र

शासनाच्या पूर्व परवानगीशिवाय वनेतर कामास बंदी, अशी नोंद ठेवण्यात आली असून तसा फेरफार देखील नोंदविण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी वन विभागाची कोणतीही परवानगी न घेता आरसीसी स्वरुपाचे संरक्षण भिंतीचे अनधिकृत बांधकाम केलेल्या कंपनीवर अद्याप गुन्हा दाखल करण्यात आलेला नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळुन आले, तद्नुषंगाने कंपनीवर तसेच कारवाई करण्यास विलंब करणाऱ्या अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संजय राठोड :** (१) मौजे लोनाड, ता.भिवंडी, जि.ठाणे येथील सर्व्हे नंबर २३/ब या ठिकाणी गल्फ ऑइल कॉर्पोरेशन ली. मुंबई यांनी हजारो वृक्षांची कत्तल करुन बांधलेल्या अनधिकृत संरक्षण भिंत बांधकामाबाबत गल्फ ऑईल कॉर्पोरेशन लि.कंपनी प्रशासनावर फौजदारी गुन्हा दाखल करुन अनधिकृत संरक्षण भिंत बांधकाम त्वरीत निष्कासित करण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी दिनांक ६.२.२०१९ रोजी मा.मुख्यमंत्री यांना उद्देशून निवेदन दिल्याचे निदर्शनास येते. सदर निवेदनाची प्रत मा.मंत्री (महसूल), मा.मंत्री (वने) व मा.मंत्री (पर्यावरण) यांना पृष्ठांकित केल्याचे दिसून येते.

तसेच श्रमजीवी संघटना, भिवंडी महाराष्ट्र यांनी लोनाड (ता.भिवंडी) या ठिकाणी गल्फ ऑईल कॉर्पोरेशन लि.,मुंबई ही कंपनी रस्त्याचे खोदकाम करण्याचा प्रयत्न करीत असून त्यावर योग्य ती कार्यवाही करण्याबाबत मुख्य वनसंरक्षक (प्रा.), ठाणे यांचेकडे दिनांक २८.९.२०१९ रोजी तक्रार केली आहे.

सदर तक्रारीचे अनुषंगाने क्षेत्रिय स्तरावर जागेवर पाहणी केली असता गल्फ ऑइल कॉर्पोरेशन लि.मुंबई यांनी लोनाड येथील सर्व्हे नं.२३/ब चे जागेत पुर्वीपासून अस्तित्वात असलेल्या आरसीसी संरक्षण भिंतीचे ४ ते ५ वर्षापूर्वी दुरुस्तीचे काम केले असल्याचे आढळून आले आहे. परंतू, सदर भिंतीचे दुरुस्तीचे काम करताना कोणत्याही प्रकारची वृक्षतोड झालेली नसल्याचे दिसून येते.

(२) हे खरे आहे.

(३), (४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## इचलकंरजी (जि.कोल्हापूर) येथील शिवम सहकारी बँकेत झालेला गैरव्यवहार

**(२) * १६१२ श्री.सुनिल राऊत (विक्रोळी), श्री.सदा सरवणकर (माहिम) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) इचलकंरजी (जि.कोल्हापूर) येथील शिवम सहकारी बॅकेत कै.वसंतराव नाईक भटक्या विमुक्त जमाती सहकारी सूतगिरणी लि., सोलापूर या संस्थेच्या नावे बनावट कागदपत्रांद्वारे कर्जखाती उघडली आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर संस्थेने चार बनावट कर्जखाती उघडून सुमारे २५ कोटी ४० लाख ४० हजार ७९९ रूपयांचा गैरव्यवहार केला असल्याचे माहे नोव्हेंबर, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने सखोल चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, तद्नुषंगाने संबंधित दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील :** (१) व (२) होय.

शिवम सहकारी बँकेच्या सन २०१७-१८ या आर्थिक वर्षाच्या लेखापरिक्षण अहवालावरुन संबंधित कै.वसंतराव नाईक भटक्या विमुक्त जमाती सहकारी सुतगिरणी लि. सोलापूर या सुतगिरणीच्या नावे बनावट खाते निर्माण करुन रु.२४.४२ कोटी रकमेचा गैरव्यवहार झाल्याचे निदर्शनास आले आहे.

(३) सदर बँकेच्या सन २०१७-१८ या आर्थिक वर्षाच्या लेखापरिक्षण अहवालानुसार संबंधित दोषींविरुध्द शिवाजीनगर पोलीस ठाणे, इचलकरंजी येथे दिनांक १२.११.२०१९ रोजी FIR क्र.०५९९/२०१९ दाखल करण्यात आला आहे.

महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० च्या कलम ८८ अन्वये संस्थेत झालेल्या आर्थिक नुकसानीची जबाबदारी निश्चित करण्यासाठी सहकार आयुक्त कार्यालयाकडून दिनांक १९.१२.२०१९ रोजी चौकशीचे आदेश देण्यात आले आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मौजे कारला व कुमठा (ता.औसा, जि.लातुर) या भूकंपग्रस्त गावांचे पुनर्वसन करण्याबाबत

**(३) * १७६० श्री.अभिमन्यु पवार (औसा) :** सन्माननीय **भूकंप पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे कारला व कुमठा (ता.औसा, जि.लातूर) येथील दोन्ही गावे ही किल्लारी गावा लगतची असून सन १९९३ व त्यानंतर झालेल्या अनेक लहान मोठ्या भूकंपाच्या धक्क्यामुळे गावातील घरे राहण्यायोग्य राहिली नसल्याने या गावांचे संपूर्ण पुनर्वसन करण्याबाबत जिल्हाधिकारी, लातूर यांनी रुपये ४७.८७ कोटींचा प्रस्ताव शासनास सादर केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रस्तावाच्या अनुषंगाने शासनाकडून जिल्हाधिकारी, लातूर यांच्याकडून कोणत्या मुद्यांची माहिती मागविण्यात आली आहे,

(३) असल्यास, सुमारे २७ वर्षाचा कालावधी उलटूनही उक्त गावांचे पुनर्वसन न झाल्याची कारणे काय आहेत,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी करुन गावांचे पुनर्वसन करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संजय राठोड :** (१) होय.

(२) शासन पत्र दि. २३.०४.२०१९ अन्वये जिल्हाधिकारी, लातूर यांचेकडून खालील मुद्दयांची माहिती मागविण्यात आली आहे :- अ) सार्वजनिक बांधकाम विभागाच्या सन २०१९-२० च्या दरसूचीनुसार खर्चाचे अंदाजपत्रक सादर न करता सन २०१८-१९ नुसार अंदाजपत्रक सादर करण्यात आले आहे.

ब) पत्रासोबत सादर प्रस्तावामध्ये मौजे कार्ला व कुमठा येथील भुकंपग्रस्तांसाठी बांधावयाच्या प्रस्तावित घरकुलाचे क्षेत्रफळ नमूद केलेले नाही. यासंदर्भात शासनाच्या सन १९९३-९४ च्या निर्णयानुसार अनुज्ञेय क्षेत्रफळाचे घरकुल लाभार्थ्यांना देण्याचे प्रस्तावित आहे किंवा कसे,

क) प्रकल्प संचालक, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, लातूर यांच्या दि.२०.०५.२०१९ च्या पत्रानुसार मौजा कार्ला व कुमठा येथील लाभार्थ्यांना घरासाठी एकूण रू. १,५०,५००/- इतके अनुदान देता येईल किंवा कसे,

(३), (४) व (५) शासनाच्या प्रचलित निर्णयानुसार तसेच दरसूचीनुसार प्राप्त प्रस्ताव नसल्याने कार्यवाही पूर्ण होऊ शकलेली नाही.

-----------------

## कोसंबी रिठ (ता.पोंभुर्णा, जि.चंद्रपूर) येथील संपादीत शेतजमिनींचा मोबदला शेतकऱ्यांना देण्याबाबत

**(४) * ५९४५ श्री.सुधीर मुनगंटीवार (बल्लारपूर) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोसंबी रिठ (ता.पोंभुर्णा जि.चंद्रपूर) येथील महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळासाठी जमिनी संपादीत करण्यात आल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर संपादीत शेतजमीनींचा मोबदला संबंधितांना मिळण्याबाबत लोकप्रतिनिधी यांनी मा.उद्योग मंत्री यांना दिनांक ३१ जानेवारी, २०२० रोजी वा त्यासुमारास लेखी निवेदन सादर केले आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने शेतकऱ्यांना शेतजमिनीचा मोबदला देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देसाई :** (१) व (२) होय, हे खरे आहे.

(३) व (४) मौजे कोसंबी (रिठ) येथील संपादीत होणाऱ्या जमिनीचा मोबदला शेतकऱ्यांना वाटप करून १०.७५ हे.आर जागेचा ताबा महामंडळास प्राप्त झालेला आहे. सलगतेने उपलब्ध होणाऱ्या उर्वरीत क्षेत्रासाठीच मोबदला वितरण करून भूसंपादनाची कार्यवाही भूसंपादन अधिकारी यांचे मार्फत चालू आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

# मौजे चाळ (ता.पनवेल, जि.रायगड) येथील तळोजा पाणी पुरवठा योजनेसाठी संपादीत केलेल्या जमिनींचा मोबदला शेतकऱ्यांना देण्याबाबत

**(५) * ४१६ श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.महेश बालदी (उरण), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे चाळ (ता.पनवेल, जि.रायगड) येथील महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाने तळोजा पाणी पुरवठा योजनेसाठी संपादीत केलेल्या जमिनींचा मोबदला शेतकऱ्यांना अद्यापही मिळाला नसल्याचे माहे जानेवारी, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त विभागातील पाणी पुरवठा योजनेसाठी जवळपास ३५ वर्षे होवूनसुद्धा शेतकऱ्यांना कोणत्याही स्वरूपात जमिनीचा मोबदला दिला गेला नसल्याने शेतकऱ्यांमध्ये तीव्र असंतोषाची भावना निर्माण झाली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी नुकसान भरपाई मिळावी म्हणून शेतकऱ्यांनी मागणी व निवेदने देऊनही संबंधीत विभागाने कोणतीच कार्यवाही केलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, तद्नुषंगाने शेतकऱ्यांना तातडीने नुकसान भरपाई देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देसाई :** (१), (२) व (३) अंशत: खरे आहे.

मौजे-चाळ येथील महामंडळाने पाणीपुरवठा योजनेसाठी संपादीत केलेल्या जमिनीच्या संबंधीत खातेदारांना सन १९९४ पर्यंतचे वार्षिक भू-भाडे अदा करण्यात आले असून जमीन अंतिमत: भूसंपादन करणेची कार्यवाही चालू आहे.

(४) संपादीत क्षेत्राचा निवाडा अंतिम करण्याबाबतची कार्यवाही उपविभागीय अधिकारी, पनवेल यांच्या स्तरावर सुरु आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## सिरोंचा (जि.गडचिरोली) येथे शेतमाल विक्रीसाठी आधारभूत खरेदी केंद्र सुरु करण्याबाबत

**(६) * ३५३६ श्री.कृष्णा गजबे (आरमोरी) :** सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सिरोंचा (जि.गडचिरोली) तालुक्यातील कापुस व मिरची उत्पादक शेतकऱ्यांना माल विक्रिकरीता आधारभुत खरेदी केंद्र तसेच जिनिंग मिल उपलब्ध नसल्याची बाब माहे जानेवारी, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सिरोंचा तालुक्यातील सुमारे ६,७२७ हेक्टरवरील कापुस व मिरची उत्पादक शेतकऱ्यांना खरेदी केंद्राअभावी त्यांचा शेतमाल तेलंगणा राज्यात नेऊन कमी दराने विक्री करावा लागत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,
(४) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने उक्त तालुक्यात कापुस व मिरची उत्पादक शेतकऱ्यांसाठी खरेदी केंद्र सुरु करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील :** (१), (२), (३) व (४) होय.

राज्यात किमान आधारभूत किंमतीने कापसाची खरेदी भारतीय कापूस निगम लि. (सी.सी.आय.) यांच्या वतीने महाराष्ट्र राज्य सहकारी कापूस उत्पादक पणन महासंघ मर्यादित यांच्यामार्फतही करण्यात येत आहे. यासंदर्भात सी.सी.आय. सोबत केलेल्या करारानूसार जिनिंग प्रेसिंग फॅक्टरी उपलब्ध असलेल्या ठिकाणी कापूस खरेदी केंद्र सुरु करणे आवश्यक आहे. गडचिरोली जिल्ह्यात सिरोंचा तालुक्यात एकही जिनिंग प्रेसिंग फॅक्टरी

उपलब्ध नाही. या जिल्ह्यातील चामोर्शी तालुक्यात अनखोडा येथे जिनिंग प्रेसिंग फॅक्टरी उपलब्ध असल्यामुळे तेथे महाराष्ट्र राज्य सहकारी कापूस उत्पादक पणन महासंघाकडून हमी दराने कापूस खरेदी सुरु असून, दि.१५/२/२०२० पर्यंत ६८०८ क्विंटल कापसाची खरेदी झालेली आहे. सदर केंद्रावर सिरोंचा तालुक्यातील काही शेतक-यांनी कापूस विक्रीस आणत आहेत.

केंद्र शासनाने मिरची ला शेतमालाला किमान आधारभूत किंमत घोषित केलेला नसल्यामुळे मिरचीची हमी भावाने खरेदी केली जात नाही.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## फुलसावंगी (जि.यवतमाळ) येथील दलित वस्त्यांची विकास कामे निकृष्ट दर्जाची करण्यात आल्याबाबत

**(७) * २६६५ श्री.नामदेव ससाने (उमरखेड) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) फुलसावंगी (जि.यवतमाळ) येथील भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या सुवर्ण जयंतीच्या कार्यक्रमांतर्गत करण्यात आलेली दलित वस्त्यांची विकास कामे अत्यंत निकृष्ट दर्जाची झाली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त कामाकरिता नाल्यातील माती मिश्रित वाळूची चोरी करुन त्याचा वापर करीत असल्याची बाब माहे जानेवारी, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, तद्‌नुषंगाने संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. धनंजय मुंडे :** (१) व (२) हे खरे नाही.

(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## जिंतूर (जि.परभणी) तालुक्यात शिक्षणासाठी येणाऱ्या आदिवासी समाजातील विद्यार्थ्यांकरीता स्वतंत्र वसतीगृह उभारण्याबाबत

**(८) * ७५५० श्रीमती मेघना साकोरे बोर्डीकर (जिंतूर) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जिंतूर (जि.परभणी) तालुक्यामध्ये शिक्षणासाठी ग्रामीण भागातील आदिवासी मुलामुलींचे येण्याचे प्रमाण अधिक असून आदिवासी मुलामुलींसाठी स्वतंत्र वसतीगृह नसल्याने आदिवासी समाजातील विद्यार्थ्यांना राहण्याकरिता अनेक अडचणींना सामोरे जावे लागत असल्याची बाब माहे जानेवारी, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सद्य:स्थितीत आदिवासी विद्यार्थ्यांना राहण्याची व्यवस्था मागासवर्गीय वसतिगृहात करण्यात येते, परंतु मागासवर्गीय विद्यार्थ्यांची संख्या जास्त असल्याने, तसेच वसतीगृहाच्या कमतरतेमुळे आदिवासी विद्यार्थ्यांची राहण्याची व्यवस्था होत नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, आदिवासी मुलामुलींचे शैक्षणिक नुकसान टाळण्यासाठी आदिवासी विभागाकडून स्वतंत्र वसतीगृह बांधण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. के.सी.पाडवी :** (१) व (२) हे खरे आहे. एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, कळमनुरी, जि.हिंगोली यांच्या अधिनस्त परभणी जिल्ह्यात परभणी येथे ३ मुलींचे व २ मुलांचे असे एकूण ५ शासकीय वसतीगृहे कार्यरत आहेत.

(३) व (४) वसतीगृहात प्रवेश न मिळालेल्या विद्यार्थ्यांसाठी विभागाने पंडित दिनदयाल उपाध्याय स्वयम् योजना सुरू केली आहे. याअंतर्गत इयत्ता १० वी नंतरच्या दोन वर्ष किंवा त्यापेक्षा अधिक कालावधीच्या व्यावसायीक व तांत्रिक अभ्यासक्रमामध्ये प्रवेश घेतलेल्या परंतु शासकीय वसतीगृहामध्ये प्रवेश न मिळालेल्या अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांना भोजन, निवास व इतर शैक्षणिक साहित्य उपलब्ध करुन घेण्यासाठी तालुकास्तर, जिल्हास्तर,

विभागीयस्तर व मोठया शहरांमध्ये (महानगरांमध्ये) शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांच्या आधार संलग्न बँक खात्यामध्ये निर्धारीत करण्यात आलेली रक्कम थेट जमा करण्यात येते.

-----------------

## राज्यात विदर्भ, मराठवाडा व मध्य महाराष्ट्रातील अनेक भागात वादळी पाऊस, गारपीट व अवकाळी पावसाने शेतकऱ्यांचे झालेले नुकसान

**(९) * ९ श्री.देवेंद्र फडणवीस (नागपूर दक्षिण पश्चिम), श्री.चंद्रकांत (दादा) पाटील (कोथरुड), श्री.सुधीर मुनगंटीवार (बल्लारपूर), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (तुळजापूर), श्रीमती देवयानी फरांदे (नाशिक मध्य), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.राम कदम (घाटकोपर पश्चिम), श्री.अभिमन्यु पवार (औसा), श्री.जयकुमार रावल (शिंदखेडा), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.महेश बालदी (उरण), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.प्रमोद (राजू) रतन पाटील (कल्याण ग्रामीण), श्री.फारूक शाह (धुळे शहर), श्री.अनिल बाबर (खानापूर), श्रीमती यामिनी यशवंत जाधव (भायखळा), श्री.संतोष दानवे (भोकरदन), श्रीमती श्वेता महाले (चिखली), श्री.समिर मेघे (हिंगणा), श्री.मोहन मते (नागपूर दक्षिण), श्री.सुनील राणे (बोरीवली), श्रीमती माधुरी मिसाळ (पर्वती), श्री.कुमार आयलानी (उल्हासनगर), श्री.राजेंद्र पाटणी (कारंजा), श्री.योगेश सागर (चारकोप), श्री.संतोष बांगर (कळमनुरी), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), श्री.नारायण कुचे (बदनापूर), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), डॉ.अशोक उईके (राळेगाव), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.मोहनराव हंबर्डे (नांदेड दक्षिण), श्री.देवेंद्र भुयार (मोर्शी), श्री.संजय सावकारे (भुसावळ), श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला), श्री.प्रताप अडसड (धामणगाव रेल्वे), श्री.सुभाष देशमुख (सोलापूर दक्षिण) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात विशेषतः विदर्भ, मराठवाड्यातील व मध्य तसेच उत्तर महाराष्ट्रातील अनेक भागात वादळी पाऊस व गारपीट झाल्याने रब्बी पिकांसह भात, गहू, कापूस, तूर, सोयाबीन व इतर कडधान्ये आणि संत्रा, मोसंबी फळबागांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाल्याचे माहे जानेवारी, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) तसेच, भंडारा जिल्हयात आधारभूत धान खरेदी केंद्रावर असलेले धान अवकाळी पावसाने भिजून अनेक शेतकऱ्यांचे आर्थिक नुकसान झाले, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, शासनाने उक्त नुकसानीचे पंचनामे करुन बाधित शेतकऱ्यांना त्यांच्या नुकसानीची भरपाई म्हणून सरसकट हेक्टरी २५ हजार देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) तसेच, राज्य शासनाने राज्यातील शेतकऱ्यांना दोन लाख रुपयांपर्यतच्या कर्जमाफीचा अध्यादेश काढला तथापि, अद्याप अध्यादेशाची अंमलबजावणी झाली नसल्याचे निदर्शनास आले आहे, असल्यास सदरहू अध्यादेशाची अंमलबजावणी कधी पासून करण्यात येणार आहे,
(५) असल्यास, उपरोक्त संदर्भात शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले, तद्नुषंगाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विजय वडेट्टीवार :** (१) राज्यात माहे डिसेंबर, २०१९ व जानेवारी, २०२० याकालावधीत अवेळी पाऊस व गारपीटीमुळे ७ जिल्हयांमधील ९८,०८१ हेक्टर क्षेत्रातील शेती पिके व फळ पिकांचे नुकसान झाले आहे.
(२) अंशतः खरे आहे.

खरेदी केंद्रावर आलेले धान ताडपत्री व पॉलिथीनने सुरक्षित झाकुन ठेवण्यात आले होते. तसेच पाण्याने ओलसर झालेले धान पिक सुकवून वाळवून त्याची खरेदी करण्यात आलेली आहे.
(३) राज्यात माहे डिसेंबर, २०१९ व जानेवारी, २०२० याकालावधीत अवेळी पाऊस व गारपीटीमुळे शेती व फळपिकांचे झालेले नुकसानीबाबत आर्थिक मदत देण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे.

(४) व (५) शासन निर्णय क्रमांक कृकमा-१२१९/प्र.क्र.१५७/२-स, दि.२७.१२.२०१९ अन्वये महात्मा ज्योतीराव फुले शेतकरी कर्जमुक्ती योजना, २०१९ या योजने अंतर्गत शेतकऱ्यांना कर्जमुक्ती देण्याचा निर्णय घेतलेला आहे.

सदर योजनेच्या अंमलबजावणीची कार्यवाही सुरू झालेली असून दिनांक ०३.०३.२०२० अखेर पर्यंत १२.०१ लाख कर्जखात्यांचे प्रमाणीकरण करण्यात आलेले असून ११.४० लाख कर्जखात्यांना रू.७५०० कोटी रक्कम मंजूर करण्यात आली आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## नांदुरा (जि.बुलढाणा) येथे ३३ के.व्ही. विद्युत उपकेंद्राची श्रेणी वर्धित करण्याबाबत

**(१०) * २२६८ श्री.राजेश एकडे (मलकापूर) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नांदुरा (जि.बुलढाणा) येथील ३३ के.व्ही. विद्युत उपकेंद्रातील विद्युत यंत्रणा व वाहिन्या जीर्ण झाल्याने विद्युत पुरवठा वारंवार खंडित होत असल्याची बाब दिनांक १ नोव्हेंबर, २०१९ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कालबाह्य विद्युत यंत्रणा व वाहिन्या यामध्ये वारंवार बिघाड होत असल्याने नागरिकांची गैरसोय होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, तद्नुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी कालबाह्य झालेल्या मशिनरी व जीर्ण झालेल्या विद्युत वाहिन्या बदलून सदर ठिकाणी जास्त क्षमतेचे ट्रांसफार्मर बसविण्याबाबत व सदर उपकेंद्र श्रेणी वर्धित करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. नितिन राऊत :** (१) व (२) नांदुरा (जि.बुलढाणा) येथील वीज पुरवठा हा वाहिन्या जीर्ण झाल्याच्या कारणामुळे खंडीत होत नाही. तथापि, ३३ के.व्ही. नांदुरा उपकेंद्रास वीज पुरवठा करणाऱ्या १३२ के.व्ही. मोताळा येथून निघणाऱ्या ३३ के.व्ही. मोताळा-नांदुरा वाहिनीवर ३ उपकेंद्र जोडलेले असल्यामुळे एखादेवेळी तांत्रिक बिघाड किंवा अतिभारीत झाल्यास नांदुरा उपकेंद्राचा वीज पुरवठा खंडीत होतो.

(३) याबाबत महावितरण कंपनीमार्फत चौकशी करण्यात आली आहे. सद्यस्थितीत ३३/११ के.व्ही. नांदुरा उपकेंद्रास मोताळा अति उच्चदाब उपकेंद्रातून निघणाऱ्या मोताळा-नांदुरा वीज वाहिनीव्दारे तसेच मलकापूर अति उच्चदाब उपकेंद्रातून निघणाऱ्या मलकापूर-नांदुरा या ३३ के.व्ही. वाहिनेद्वारे वीज पुरवठा जोडलेला आहे. यापैकी ३३ के.व्ही. मलकापूर-नांदुरा वाहिनीवर बेलाड, चांदुरविस्बा ही ३ उपकेंद्र जोडली असल्यामुळे ती अतिभारीत होत असल्याने, १३२ के.व्ही. मलकापूर उपकेंद्रातून येणारा ३३ के.व्ही.चा स्त्रोत नांदुरा उपकेंद्रासाठी कायमस्वरुपी वापरता येत नाही. तसेच ३३ के.व्ही. मोताळा वाहिनीवर नांदुरा उपकेंद्रासह सुजातपूर, निमगांव, नारखेड ही तीन उपकेंद्र जोडलेली आहेत. त्यामुळे वाहिनी अतिभारीत होते व त्यामुळे वाहिनी अतिभारीत होते व त्यामुळे या वाहिनीवरील भार कमी करण्याच्या दृष्टीने ३३ के.व्ही. नारखेड व ३३ के.व्ही. निमगांव या वाहिन्यांना १३२ के.व्ही उपकेंद्र जळगांव जामोद येथून स्वतंत्ररित्या वीज पुरवठा मिळण्याच्या हेतूने पॉवर इव्हॅक्यूएशन (Power Evacuation DPR) योजनेअंतर्गत प्रस्तावित आहे.

(४) उपकेंद्राची क्षमता ६.१५ एम.व्ही.ए वरुन १० एम.व्ही.ए करण्यात आली आहे. नांदुरा उपकेंद्रातील इनडोअर व्हिसीबीचे रुपांतर आऊटडोअरमध्ये करण्यात आले आहे. तसेच अखंडित वीज पुरवठयाकरिता ३३ के.व्ही. स्वतंत्र वीज वाहिन्या उभारण्याचे प्रस्तावित आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## सोलापूर जिल्हयातील चिंचोळी औद्योगिक वसाहत माळढोक पक्षी अभयारण्याच्या क्षेत्रातून वगळण्याबाबत

**(११) * ६९५४ कुमारी प्रणिती शिंदे (सोलापूर शहर मध्य) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सोलापूर जिल्हयातील चिंचोळी औदयोगिक वसाहत माळढोक पक्षी अभयारण्याच्या परिक्षेत्रातून वगळण्याचा निर्णय घेतला परंतू या क्षेत्राला पर्यावरण संवेदनशील क्षेत्र जाहिर करण्यात आल्याने औदयोगिक विकासास बाधा निर्माण होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन चिंचोळी औद्योगिक वसाहत पर्यावरण संवेदनशील क्षेत्रातून वगळण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संजय राठोड :** (१) व (२) सोलापूर जिल्हयातील मौजा चिंचोली या गावातील कोणतेही क्षेत्र माळढोक पक्षी अभयारण्यात समाविष्ट नाही. परंतु नजीकचे मौजा कोंडी या गावातील क्षेत्र माळढोक पक्षी अभयारण्याचे क्षेत्राभोवती असलेल्या पुर्वीच्या १० कि.मी. अंतराच्या मानीव पर्यावरण संवेदनशील क्षेत्राचे सीमेत येत असल्याने औद्योगिक विकासासंबंधी अडचणी येत होत्या. तथापि, पर्यावरण, वने आणि वातावरण बदल मंत्रालय, नवी दिल्ली यांनी दिनांक ११.०२.२०२० रोजीच्या अंतिम अधिसूचने अन्वये माळढोक पक्षी अभयारण्याच्या सभोवताल पर्यावरण संवेदनशील क्षेत्र घोषित केले आहे. सदर अधिसूचनेप्रमाणे औद्योगिक वसाहतीचे ठिकाणी पर्यावरण संवेदनशील क्षेत्राची सीमा ० कि.मी. ठेवण्यात आली आहे. त्यामुळे औद्योगिक विकासास बाधा येत नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## वरळी (मुंबई) येथील भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर वसतीगृहात सोई-सुविधा पुरविण्याबाबत

**(१२) * ५९४० श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.प्रशांत बंब (गंगापूर), श्रीमती यामिनी यशवंत जाधव (भायखळा), श्री.लहू कानडे (श्रीरामपूर), श्री.योगेश सागर (चारकोप), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), डॉ.बालाजी किणीकर (अंबरनाथ) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वरळी (मुंबई) येथील भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर वसतीगृहाच्या विद्यार्थ्यांनी वसतीगृहातील असुविधांबाबत माहे जानेवारी, २०२० मध्ये वा त्यादरम्यान आंदोलन केले असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, निकृष्ट दर्जाचे जेवण, शैक्षणिक साहित्याचा अभाव, शिष्यवृत्ती न मिळणे तसेच इमारतीची झालेली दुरवस्था या बाबींमुळे विद्यार्थ्यांची गैरसोय होत असल्यामुळे तक्रार केली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, तदनुषंगाने उक्त वसतीगृहातील विद्यार्थ्यांना सोई-सुविधा पुरविण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. धनंजय मुंडे :** (१) होय.

(२) होय, अंशत: खरे आहे.

वसतिगृहाच्या चव रजिस्टरमध्ये बहुतांश विद्यार्थ्यांनी चांगला शेरा दिला आहे. जुन्या प्रवेशित विद्यार्थ्यांचे शैक्षणिक साहित्याचे पैसे जमा झाले असून नवीन प्रवेशित विद्यार्थ्यांचे देयक कोषागारात सादर करण्यात आले आहे.

इमारत दुरूस्तीसाठी रू.१,४९,५१,६४२.००/- (रूपये एक कोटी एकोणपन्नास लक्ष एकावन्न हजार सहाशे बेचाळीस फक्त) इतक्या रकमेच्या खर्चास प्रशासकीय मान्यता देण्यात आलेली आहे.

(३) होय.

सोयी-सुविधाबाबत लोखंडी कॉट, गादी, उशी, टेबल, खुर्ची, प्रयोगशाळा साहित्य इत्यादी वस्तूंच्या खरेदीस मान्यता देण्याची बाब विचाराधीन आहे. त्यापैकी डायनिंग टेबल, खुर्ची, बँच, कपाट व पलंग या वस्तू पुरविण्यात आल्या आहेत. तसेच जिल्हाधिकारी, मुंबई शहर यांच्या कार्यालयाकडून खुर्ची, प्रिंटर, संगणक, कपाट इत्यादी वस्तू वसतिगृहास प्राप्त झालेल्या आहेत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## कोल्हापूर जिल्ह्यातील बोगस मागासवर्गीय औद्योगिक संस्थांबाबत

**(१३) * ३३९८ श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कोल्हापूर जिल्ह्यात शासनाकडून कोट्यवधी रुपयांचे भाग भांडवल घेवून उद्योग न उभारणाऱ्या ४२ मागासवर्गीय संस्थांनी शासनाचे १२५ कोटी रुपये अनुदान घेतल्याचे माहे जुलै, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मागासवर्गीय औद्योगिक संस्था उभारण्यासाठी कोट्यवधी रुपयांचा निधी मंजुर करण्यात आला असून संस्थेच्या पदाधिकाऱ्यांनी शासनाची फसवणूक करुन संस्थांच्या नावावर अनुदान घेतले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने अधिक चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, तद्नुसार संबंधितांवर कारवाई करुन दिलेले अनुदान वसूल करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. धनंजय मुंडे :** (१), (२) व (३) सदर संस्थांना दिलेल्या अर्थसहाय्य रक्कमेची दंडात्मक व्याजदरासह महसुली थकबाकी म्हणून Maharashtra Land Revenue Code १९६६ आणि Revenue Recovery Act,१८९० प्रमाणे वसुलीची कारवाई करण्यासंदर्भात जिल्हाधिकारी, कोल्हापूर यांना कळविण्यात आले आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## कुरुंदवाड (जिल्हा कोल्हापूर) येथील एस.के.पाटील सहकारी बँकेत झालेला गैरव्यवहार

**(१४) * ४०४ श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कुरुंदवाड (जिल्हा कोल्हापूर) येथील एस.के.पाटील सहकारी बँकेच्या संचालकांनी केलेल्या आर्थिक गैरव्यवहारामुळे बँकेवर शासनाने सन २००८ मध्ये अवसायक नेमण्यात येऊन १० वर्षांचा कालावधी झाली आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त बॅकेतील ठेवीदारांच्या कोट्यवधी रुपयांच्या ठेवी अद्याप ठेवीदारांना परत मिळालेल्या नाहीत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी करुन अवसायक नेमून १० वर्ष पूर्ण झाली तरी ठेवीदारांच्या ठेवी त्यांना परत न मिळण्याची कारणे काय आहेत,

(४) तसेच बँकेतील ठेवीदारांना त्यांच्या ठेवी परत देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील :** (१) होय.

(२), (३) व (४) सहकार आयुक्तांनी त्यांच्या दि. १३.०९.२०१९ रोजीच्या पत्रान्वये बँकेच्या अवसायन कालावधीस मुदतवाढ नाकारली असल्याने सध्यस्थितीत अधिनियमातील तरतुदीनुसार बँकेवर कस्टोडीयन नेमणूकीची कार्यवाही सुरू आहे.

बँक अवसायनात घेतली त्या दिनांकास बँकेमध्ये ९४१६ ठेवीदारांच्या रु. २२.०२ कोटींच्या ठेवी होत्या. त्यापैकी जानेवारी, २०२० अखेर ३८२२ ठेवीदारांना रु. १३.१२ कोटींच्या ठेवींचे वाटप करण्यात आले आहे.

अधिनियमाच्या कलम ८८ अन्वये चौकशी अधिकारी यांनी १७ संचालकांवर रु. १६.५० कोटी रक्कमेची जबाबदारी निश्चीत केली आहे. त्यापैकी ९ संचालकांच्या रु. ४.२३ कोटी रक्कमेच्या स्थावर मालमत्ता जप्त केल्या असून सदर मालमत्तांच्या विक्री करणेबाबतची कार्यवाही सुरु आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## उल्हासनगर (जि.ठाणे) येथे चर्मकार समाजासाठी संत रोहिदास भवन बांधण्याबाबत

**(१५) * ४७८० श्री.कुमार आयलानी (उल्हासनगर), श्री.गणेश नाईक (ऐरोली) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उल्हासनगर (जि.ठाणे) येथे चर्मकार समाजाच्या कार्यासाठी शहरामध्ये समाज सभागृह नसल्यामुळे संत रोहिदास भवन बांधण्यासाठी जागा उपलब्ध करुन देण्याबाबतची मागणी लोकप्रतिनिधींनी मा.सामाजिक न्याय मंत्री यांचेकडे दिनांक २३ ऑक्टोबर, २०१९ रोजी वा त्यासुमारास केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी उल्हासनगर-१ येथिल राम जपो आश्रमाच्या लगत महानगरपालिकेची मोकळी जागा असून, उक्त जागा चर्मकार समाज गत १५ वर्षापासून सांभाळत असून सदर जागेवर समाजाचे सभागृह बांधून देण्यासाठी सन २०१२ पासून वांरवार मागणी होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर मागणीकडे महानगरपालिका दुर्लक्ष करीत असल्याने चर्मकार समाजामध्ये नाराजीचे वातावरण निर्माण झाले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी करुन चर्मकार समाजासाठी संत रोहिदास भवन बांधण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. धनंजय मुंडे :** (१) हे खरे नाही.

(२) व (३) आयुक्त, उल्हासनगर महानगपालिका यांनी दिलेल्या माहितीनुसार अशा प्रकारचा पत्रव्यवहार सन २०१२ पासून महानगरपालिकेकडे केल्याचे आढळुन आलेले नाही.

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## रायगड जिल्ह्यात ११ केव्ही विद्युत रोहित्र प्रणालीद्वारे वीज पुरविण्याबाबत

**(१६) * २०६२ श्री.रविशेठ पाटील (पेण) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात सर्व ठिकाणी ११ केव्ही विद्युत रोहित्र प्रणालीव्दारे (पॉवर ट्रान्स्फार्म) विद्युत वितरण सेवा असतांना केवळ रायगड जिल्ह्यात २२ के.व्ही. विद्युत रोहित्र प्रणालीव्दारे वीज पुरवठा केला जात आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, यामुळे वारंवार वीज खंडीत होत असल्याने नागरिकांची मोठी गैरसोय होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, रायगड जिल्ह्यात वीज मागणीप्रमाणे टप्याटप्याने आवश्यक त्या ठिकाणी ११ के.व्ही. विद्युत रोहित्र प्रणाली बसवून सुरळीत वीज पुरवठा करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. नितिन राऊत :** (१) राज्यात रायगड जिल्ह्यासह पुणे, सातारा, पालघर व ठाणे या जिल्ह्यामंध्ये महापारेषण कंपनीव्दारे वीजेचे वितरण करण्यासाठी उपलब्ध केलेल्या २२ के.व्ही. विद्युत प्रणालीद्वारे वीज पुरवठा करण्यात येतो. राज्यातील उर्वरित सर्व जिल्ह्यांमध्ये ११ के.व्ही विद्युत प्रणालीद्वारे वीज पुरवठा देण्यात येतो.
(२) हे खरे नाही. २२ के. व्ही. उच्चदाब वाहिनी व ११ के. व्ही. उच्चदाब वाहिनी यांच्या संचलन व सुव्यवस्थेमध्ये कोणताही लक्षणीय फरक नाही. त्यामुळे २२ के.व्ही. विद्युत वितरण प्रणालीमुळे वारंवार वीजपुरवठा खंडीत होण्याचा प्रकार घडत असल्याचे म्हणणे संयुक्तीक नाही.
(३) महावितरण कंपनीमार्फत रायगड जिल्ह्यातील ग्राहकांना वीज पुरवठा उपलब्ध करण्यात येतो. कार्यरत असलेली २२ के.व्ही. प्रणाली ११ के.व्ही द्वारे बदलविण्याकरिता पारेषण अतिउच्चदाब उपकेंद्राचे ट्रान्सफॉर्मर, २२/२२ के.व्ही. वितरण उपकेंद्रे तसेच २२/०.४१५ के.व्ही. सर्व वितरण रोहित्रे इत्यादी प्रणालीमध्ये बदल करणे आवश्यक असते. सदर बाब खर्चिक आहे त्यांच्या

आर्थिक भार ग्राहकांवर पडू शकतो. तथापि, सद्यस्थितीत २२ के.व्ही. वितरण प्रणालीव्दारे रायगड जिल्हयातील ग्राहकांना अखंडीत व दर्जेदार वीज पुरवठा उपलब्ध करण्यासाठी महावितरण कंपनीमार्फत नियमितपणे देखभाल व दुरुस्ती करण्यात येते. वीज वितरण प्रणालीचे बळकटीकरण व नूतनीकरणाचे काम दिन दयाळ उपाध्याय ग्राम ज्योती योजना (DDUGJY), एकात्मीक ऊर्जा विकास योजना (IPDS) तसेच महानगर परिक्षेत्रातील विद्युत प्रणालीचे बळकटीकरण (SSMR) योजनेव्दारे करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## महात्मा जोतिराव फुले कर्जमाफी योजनेंतर्गत दोन लाख रुपयांपर्यंतचे अल्प मुदतीचे पीककर्ज माफ करण्याबाबत

**(१७) * ८५४ श्री.संजय पोतनीस (कलिना), श्री.प्रकाश फातर्पेकर (चेंबूर), श्री.महेंद्र दळवी (अलिबाग), श्रीमती श्वेता महाले (चिखली), श्री.प्रताप सरनाईक (ओवळा माजिवडा), श्री.चंद्रकांत (भाऊ) निंबाजी पाटील (मुक्ताईनगर), श्री.देवेंद्र फडणवीस (नागपूर दक्षिण पश्चिम), श्री.चंद्रकांत (दादा) पाटील (कोथरुड), श्री.सुधीर मुनगंटीवार (बल्लारपूर), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (तुळजापूर), श्रीमती देवयानी फरांदे (नाशिक मध्य), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.वैभव नाईक (कुडाळ), श्री.संतोष बांगर (कळमनुरी), डॉ.राहूल पाटील (परभणी), डॉ.बालाजी किणीकर (अंबरनाथ), श्री.विश्वनाथ भोईर (कल्याण पश्चिम), श्री.मोहन मते (नागपूर दक्षिण), श्री.रमेश नानासाहेब बोरनारे (सर) (वैजापूर), श्री.विजयकुमार देशमुख (सोलापूर शहर उत्तर), श्री.संजय गायकवाड (बुलढाणा), श्री.नितीन अर्जुन (ए.टी.) पवार (कळवण), श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला), श्री.ज्ञानराज चौगुले (उमरगा), श्री.शांताराम मोरे (भिवंडी ग्रामीण), श्री.सदा सरवणकर (माहिम), श्रीमती यामिनी यशवंत जाधव (भायखळा), श्री.किशोर जोरगेवार (चंद्रपूर), ॲड.शहाजीबापू पाटील (सांगोले), श्री.किशोर पाटील (पाचोरा) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महात्मा जोतिराव फुले कर्जमाफी योजनेंतर्गत राष्ट्रीयकृत, जिल्हा मध्यवर्ती, ग्रामीण बँकाबरोबरच खासगी बँकेकडील दोन लाख रुपयांपर्यंतचे अल्प मुदतीचे पीककर्ज माफ करण्याचा प्रस्ताव राज्य शासनाच्या विचाराधीन आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने दिनांक ३ जानेवारी, २०२० रोजी वा त्यासुमारास आढावा बैठक घेतली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त आढावा बैठकीच्या अनुषंगाने सदरहू प्रस्तावावर शासनाने कोणता निर्णय घेतला आहे व कर्जमाफीचे कोणकोणते निकष ठरविण्यात आले, तसेच सदर कर्जमाफी योजनेत कोणत्या कालावधीतील कर्ज माफ करण्यात आले आहे,

(४) उक्त प्रकरणी अद्यापी कोणताच निर्णय घेण्यात आला नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील :** (१) महात्मा जोतिराव फुले शेतकरी कर्जमुक्ती योजनेत खाजगी क्षेत्रातील बँकाचा अंतर्भूत आहेत.

(२) अंशतः खरे आहे.

महात्मा जोतिराव फुले शेतकरी कर्जमुक्ती योजना २०१९ च्या अंमलबजावणीबाबत मा. मुख्यमंत्री यांच्या अध्यक्षतेखाली राज्यस्तरीय बँकर्स समितीची विशेष बैठक दिनांक ०३.०१.२०२० रोजी घेण्यात आली होती.

(३) शासनाने शासन निर्णय क्रमांक कृकमा १२१९/प्र.क्र.१५७/२-स दि.२७.१२.२०१९ अन्वये महात्मा जोतिराव फुले शेतकरी कर्जमुक्ती योजना २०१९ या योजने अंतर्गत शेतक-यांना कर्जमुक्ती देण्यांचा निर्णय घेतलेला आहे. सदर योजने अंतर्गत दिनांक १.०४.२०१५ ते ३१.०३.२०१९ या कालावधीत उचल केलेल्या अल्पमुदत पीककर्जाची दिनांक ३०.०९.२०१९ रोजी मुद्दल व व्याजासह थकीत असलेली व परतफेड न झालेली रक्कम रु २ लाखापर्यंत आहे अशा कर्जखात्यांना तसेच दिनांक १.०४.२०१५ ते ३१.०३.२०१९ या कालावधीत वाटप करण्यांत आलेल्या अल्पमुदत पीककर्जाचे पुनर्गठन/फेरपुनर्गठन करुन मध्यम मुदत कर्जात रुपांतरीत केलेल्या कर्जखात्याची दि. ३०.०९.२०१९ रोजी मुद्दल व व्याजासह थकीत असलेली व परतफेड न झालेली हप्त्याची रक्कम रु २ लाखापर्यंत आहे अशा कर्जखात्यांना रु २ लाखापर्यंत कर्जमुक्तीचा लाभ देण्यात येणार आहे.

सदर योजने अंतर्गत वैयक्तीक शेतकऱ्यांच्या सर्व कर्जखात्यांची एकत्रित थकबाकीची रक्कम विचारात घेऊन प्रती शेतकरी कमाल रु २ लाख मर्यादेपर्यत कर्जमुक्तीचा लाभ अनुज्ञेय आहे.

दि ३०.०९.२०१९ रोजी थकबाकीची रक्कम रु २ लाखापेक्षा जास्त असलेल्या कर्जखात्यांना सदर योजनेचा लाभ मिळणार नाही.

सदर कर्जमुक्ती योजनेसाठी खालीलप्रमाणे निकष निश्चित करण्यात आले आहेत-

१) कर्जमुक्तीचा लाभ देत असताना वैयक्तिक शेतकरी हा निकष गृहीत धरण्यात येईल.

२) या योजनेसाठी केवळ राष्ट्रीयकृत बँका, व्यापारी बँका, ग्रामीण बँका व जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका, विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्थांनी शेतकऱ्यांना दिलेले, तसेच, राष्ट्रीयकृत बँका व व्यापारी बँकांनी विविध कार्यकारी सहकारी संस्थांमार्फत शेतकऱ्यांना दिलेले अल्पमुदत पीक कर्ज व अल्पमुदत पीक कर्जाचे पुनर्गठित/फेर पुनर्गठित कर्ज विचारात घेण्यात येईल.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## ब्रम्हनाळ (ता.पलूस, जि.सांगली) येथे बोट उलटून १६ जणांचा झालेला मृत्यू

**(१८) * ६८४० श्री.रमेश कोरगांवकर (भांडूप पश्चिम) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सांगली परिसरात मोठ्या प्रमाणावर झालेली अतिवृष्टीमुळे महापुरात अडकलेल्या ब्रम्हनाळ (ता.पलूस, जि.सांगली) येथील ग्रामस्थांना सुरक्षित स्थळी घेऊन जात असताना दिनांक ८ ऑगस्ट, २०१९ रोजी वा त्यासुमारास बोट उलटून १६ जणांचा मृत्यू झाल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पुराच्या गंभीर परिस्थितीची जिल्हा व तालुका प्रशासनाला वारंवार कल्पना देऊन यांत्रिक बोटी देण्याबाबत विनंती केली असतांनाही

महसूल व पोलीस प्रशासनाने याकडे दुर्लक्ष केल्याने ग्रामपंचायतीच्या साध्या होडीतून पुरामधुन बाहेर पडण्याचा निर्णय घ्यावा लागला व त्यामुळे क्षमतेपेक्षा जास्त लोकांनी बोटीत प्रवेश केल्याने सदर दुर्घटना घडली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, तद्नुसार संबधित दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) तसेच मृत्य व्यक्तीच्या कुटूंबियांना नुकसान भरपाई देण्याच्या दृष्टिने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) असल्यास, भविष्यात गावांना पुराचा धोका पोहचू नये किंवा पुरग्रस्त गांवाच्या सुरक्षिततेच्या दृष्टिने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विजय वडेट्टीवार :** (१) अंशत: खरे आहे.

दिनांक ०८.०८.२०१९ रोजीच्या पूरात अडकलेल्या नागरिकांना सुरक्षित स्थळी हलवताना बोट उलटून १७ जणांचा मृत्यू झाला आहे.

(२) नाही.

(३) सदर दुर्घटनेची चौकशी करण्याकरीता अप्पर जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली त्रिस्तरीय चौकशी समिती गठित करण्यात आली होती. बोटीच्या खालच्या बाजुस इलेक्ट्रीक केबल अडकल्याने बोट उलटून दुर्घटना झाल्याचे निष्पन्न झाले आहे.

(४) सदर दुर्घटनेत मृत्यू झालेल्या १७ व्यक्तींच्या वारसांना राज्य आपत्ती प्रतिसाद निधीमधून (NDRF) प्रत्येकी रू. ४ लाख, मा. मुख्यमंत्री सहाय्यता निधी मधून प्रत्येकी रू. १ लाख आणि मा.पंतप्रधान सहाय्यता निधी मधून प्रत्येकी रू. २ लाख अशाप्रकारे एकूण रू. १ कोटी १९ लाख निधीची मदत देण्यात आली आहे.

(५) भविष्यात गावांना पुराचा धोका पोहचू नये किंवा पुरग्रस्त गांवाच्या सुरक्षितेच्या दृष्टिने खालील उपाययोजना व कार्यक्रम राबविण्यात येत आहेत.

(i) २०१९ च्या मान्सून कालावधीत राज्यात निर्माण झालेल्या अभुतपूर्व पूर परिस्थितीचा विचार करून जास्त क्षमतेच्या आणि सुरक्षित इन्फ्लेटेबल रबर बोट (IRB) उपलब्ध करून जिल्हा प्रशासनाला देण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे.
(II) केंद्र शासनाने देशातील पूरप्रवण जिल्हयात "आपदा मित्र" हा कार्यक्रम राबविला होता त्यामध्ये कोल्हापूर जिल्हयाचा समावेश करण्यात आला होता. "आपदा मित्र" हा कार्यक्रम राज्यातील अन्य पूरप्रवण जिल्हयात राबविण्याबाबत केंद्र शासनास विनंती करण्यात आली आहे.
(III) पूरपरिस्थिमध्ये घ्यावयाची काळजी आणि करावयाच्या उपाययोजना यासंबंधात गावस्तरावर प्रशिक्षणाचे कार्यक्रम राबविण्यात येतात. यामध्ये पूरपरिस्थितीत लोकांचे वर्तन कसे असावे, घरगुती सामुग्रीतून तरंगण्यासाठीचे साहित्य तयार करणे, शोध व बचाव, प्रथमोपचार पध्दती याबाबत जनजागृती कार्यक्रम राबविण्यात येतात.
(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## परभणी जिल्हयातील शेतकऱ्यांना रब्बी हंगामासाठी पीक कर्ज उपलब्ध करुन देण्याबाबत

**(१९) * १०६ डॉ.राहूल पाटील (परभणी) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) परभणी जिल्हा प्रशासनाने सन २०१९-२० या वर्षाच्या रब्बी हंगामासाठी बँकाना ३१३ कोटी ४७ लाखांचे पीक कर्ज वाटपाचे उद्दिष्ट दिले असतांनाही केवळ १८.०४ टक्केच पीक कर्ज वाटप करण्यात आले असल्याचे दिनांक ३१ डिसेंबर, २०१९ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी बँकेतील अधिकारी मनमानी कारभार करीत असल्यामुळे पीक कर्ज वाटप करण्यास विलंब होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने मनमानी कारभार करुन शेतकऱ्यांना वाटप करण्यात येणाऱ्या पीक कर्जास विलंब करणाऱ्या संबंधित बँकेच्या अधिकाऱ्यांवर कारवाई करुन शेतकऱ्यांना रब्बी हंगामासाठी पीक कर्ज वाटप करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील :** (१) होय.

(२) नाही.

(३) व (४) व्यवस्थापक, जिल्हा अग्रणी बँक, परभणी, विभागीय व्यवस्थापक, महाराष्ट्र ग्रामिण बँक व सरव्यवस्थापक, जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक मर्यादीत परभणी यांनी दिलेल्या माहिती प्रमाणे बँक शाखा स्तरावर पात्र शेतकऱ्यांचे कर्जमागणी अर्ज प्रलंबित नाहीत. तसेच जिल्हाधिकारी परभणी यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हयातील सर्व बँकांनी दिनांक १३.०९.२०१९, दिनांक १७.१२.२०१९, दिनांक ०१.०१.२०२०, दिनांक ०६.०१.२०२०, दिनांक २८.०१.२०२० व दिनांक १२.०२.२०२० रोजी आयोजीत DLCC व आढावा सभेमध्ये रब्बी पीक कर्ज वाटपाचा आढावा घेऊन पात्र शेतकऱ्यांना रब्बी पीक कर्ज वाटप प्राधान्यांने करण्याबाबत सुचित करण्यात आले होते. तसेच जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, परभणी यांनी वेळोवेळी सर्व बँकर्स व क्षेत्रिय कार्यालयांना सूचित करुन रब्बी पीक कर्ज वाटप वेळेवर करण्याबाबत सूचित केले होते. अवकाळी झालेला पाऊस, नैसर्गिक परिस्थिती आणि परभणी जिल्हयातील ८० % पर्यंत शेतकऱ्यांनी कापूस पिकाची लागवड केली असल्यामुळे बरेचसे शेतकरी रब्बी हंगामात पीक कर्ज घेण्यास पात्र नाहित. त्याप्रमाणे विविध राजकीय संघटना, राजकीय पक्ष यांनी वेळोवेळी केलेली पीक कर्जमाफीची मागणी, शासनाने जाहीर केलेल्या कर्जमुक्ती योजनेमुळे संबंधीत शेतकरी सभासदांकडून कर्ज भरणा होत नसल्यामुळे सदर शेतकरी रब्बी हंगामात पीक कर्ज घेण्यास अपात्र ठरलेले आहेत. त्यामुळे रब्बी हंगामात पीक कर्ज वाटपाची टक्केवारी कमी आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## नागपूर विभागातील वनमजुरांचे थकीत वेतन अदा करण्याबाबत

**(२०) * ३२६२ ॲड.माणिकराव कोकाटे (सिन्नर), श्री.मनोहर चंद्रिकापूरे (अर्जुनी-मोरगांव) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर वनवृत्त विभागामध्ये येणाऱ्या भंडारा, गोंदिया व वर्धा विभागातील हंगामी वनमजूर, बारमाही वनमजूरांसह कंत्राटी कर्मचाऱ्यांचे वेतन नियमित केले जात असताना मात्र नागपूर वन विभागातील मजूरांना गत आठ महिन्यांपासून वेतन प्रदान केले नसल्याचे दिनांक ७ जानेवारी, २०२० रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मुख्य वनसंरक्षक नागपूर येथील कार्यालयाकडून सर्व वनपरिक्षेत्रातील मजूरांच्या वेतनासाठी निधी उपलब्ध करुन दिला असल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मुख्य वनसंरक्षक कार्यालयाकडून मजुरांच्या वेतन निधीची तरतूद केलेली असतानाही नागपूर वन विभागातील मजूर कर्मचाऱ्यांचे वेतन गत आठ महिन्यांपासून अदा न करण्याची कारणे काय आहेत,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व तद्नुसार वनमजुरांना थकीत वेतन अदा करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संजय राठोड :** (१) एका वृत्तपत्रात दिनांक ०८ जानेवारी, २०२० रोजी वनमजुरांचे वेतन थकीत असल्याची बातमी प्रसिध्द झालेली आहे. सदर बातमीमध्ये मजुरांचे वेतन ८ महिन्यांपासून थकीत असल्याचे नमूद आहे. तथापि, सदर बाब वस्तुस्थितीवर आधारीत नसून दोन ते तीन महिन्यांची मजूरी प्रलंबित असल्याचे निदर्शनास आले आहे.

(२) प्रधान मुख्य वनसंरक्षक, महाराष्ट्र राज्य, नागपूर यांचे कार्यालयातून प्राप्त झालेला निधी संबंधीत उपवनसंरक्षक यांना वितरीत करण्यात आला आहे. तसेच जिल्हा योजनेअंतर्गत निधी जिल्हाधिकारी कार्यालयाकडून थेट उपवनसंरक्षक कार्यालयास उपलब्ध केला जातो. उपलब्ध निधीनुसार

उपवनसंरक्षक कार्यालयाकडून संबंधीत वनपरिक्षेत्र अधिकारी कार्यालयास निधी वितरीत केला जातो.

(३) मजूरांची मजूरी प्रामुख्याने योजना व योजनेत्तर शिर्षातून अदा केली जाते. तसेच कंत्राटी कर्मचा-यांचे वेतन योजना / कॅम्पा मधील ३% आकस्मिक निधीतून दिले जाते. तथापि, नागपूर वनविभागातील मजूर कर्मचा-यांचे वेतन उशिरा होण्याची कारणे पुढीलप्रमाणे आहेत.

अ) अर्थसंकल्पीय तरतुदीच्या तुलनेत डिसेंबर, २०१९ अखेर पर्यंत ६०% निधी योजनेत्तर व योजनेअंतर्गत निर्गमित झालेले आहे.

ब) जिल्हा योजनेअंतर्गतचा निधी नागपूर वनविभागास सप्टेंबर-२०१९ पासून उपलब्ध होण्यास सुरुवात झालेली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) वरील प्रश्न ३ अनुषंगाने नमूद केल्याप्रमाणे.

-----------------

## लातूर व उस्मानाबाद जिल्ह्यातील भूंकपग्रस्त गांवातील बाधितांच्या मागण्यांबाबत

**(२१) * २१४७ श्री.ज्ञानराज चौगुले (उमरगा) :** सन्माननीय **भूकंप पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) लातूर व उस्मानाबाद जिल्ह्यातील विविध भूंकपग्रस्त गांवातील बाधितांच्या मागण्यांबाबत विभागीय आयुक्त, औरंगाबाद यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक २८ नोव्हेंबर, २०१८ च्या शासन निर्णयान्वये नियुक्त केलेल्या अभ्यास समितीने त्यांचा अहवाल शासनास सादर केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उमरगा लोहारा तालुक्यातील भूकंपग्रस्त नागरिकांना मालकी हक्क प्रदान करणे, विविध प्रकारे होणाऱ्या हस्तांतरणाची परवानगी देणे, अधिकार खरेदीखत नोंदी करणे व त्याच्याशी निगडीत प्रक्रीया सुलभ करणे, आदी प्रक्रियांचे अधिकार ग्रामपंचायत व तहसीलदार यांना प्रदान करण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी दिनांक २४ डिसेंबर, २०१९ रोजी वा त्यासुमारास जिल्हाधिकारी, उस्मानाबाद यांच्याकडे लेखी पत्रव्यवहार केला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त अहवाल व लोकप्रतिनिधी यांनी पत्राद्वारे केलेल्या विनंतीच्या अनुषंगाने शासनाकडून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संजय राठोड :** (१) होय.

(२) होय.

(३) व (४) उस्मानाबाद जिल्ह्यातील भुकंपग्रस्त नागरीकांकडून परस्पर झालेल्या विविध प्रकारच्या (विक्री, गहाणे, बक्षीस, भाडेपट्टा इ. बाबत) हस्तांतरणाची जी प्रकरणे परवानगीसाठी प्रलंबित आहेत. त्यास समितीने त्यांच्या पत्र क्रमांक २०१८/पुनर्वसन/कक्ष-१/ कावि-५७१, दिनांक १७/०६/२०१९ च्या सहपत्र (ब) मध्ये अनुक्रमांक ९ येथे शासनास केलेल्या शिफारशीनुसार जसे जिल्हाधिकारी, लातूर यांनी त्यांच्या अधिकारात यापूर्वी त्यांच्या दि. २९/०९/२०१७, दि.१८/०१/२०१८व दि. ३१/०१/२०१८ चे आदेशानुसार विक्री, गहाणे, बक्षीस, भाडेपट्टा इ. बाबत त्यांचे स्तरावर परवानगी देणेबाबतचे अधिकार क्षेत्रीय अधिकाऱ्यांना देण्याबाबत निर्णय घेतला आहे. त्यानुसार जिल्हाधिकारी, उस्मानाबाद यांनी दि.०१/०१/२००१ रोजी पूर्वी गावठाणालगतच्या खाजगी जमिनीत अनोंदणीकृत झालेले व्यवहार नियमानुकुल करणेविषयी महाराष्ट्र गुंठेवारी विकास (नियमानुकुल, उन्नतीकरण व नियंत्रण) अधिनियम, २००१ अन्वये तसेच सदरील अधिनियमाच्या कलम ३(२) नुसार भुखंडाचे नियमानुकुल करताना अटी व शर्तीनुसार क्षेत्रिय अधिकारी यांना अधिकार प्रदान करणेबाबत कार्यवाही करण्याचे निंदेश शासन पत्र दि. १७/०२/२०२० अन्वये देण्यात आले आहेत.

-----------------

## पुणे जिल्ह्यातील सिंहगड किल्ल्यांच्या पायवाटांवरील उच्च दाबाच्या विद्युत वाहिन्यांच्या लोखंडी खांबांचे मजबुतीकरण करण्याबाबत

**(२२) * २५ श्री.भिमराव तापकीर (खडकवासला) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे जिल्ह्यातील ऐतिहासिक सिंहगड किल्ल्याच्या पायथ्यापासून गडावर जाणाऱ्या पायवाटांवर असलेल्या उच्च दाबाच्या विद्युत वाहिन्यांचे लोखंडी खांब धोकादायक झाल्याने अपघातसदृश्य परिस्थिती निर्माण झाल्याचे माहे जानेवारी, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सिंहगड किल्ल्यावर मागील २५ ते ३० वर्षांपूर्वी टाकलेले विद्युत वाहिन्यांचे खांब जीर्ण झाल्याने गडावर पायी जाणाऱ्या पर्यटक, इतिहासप्रेमी व स्थानिक नागरीकांच्या जीविताला धोका निर्माण झाला असल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू विद्युत वाहिन्या व खांबांचे मजबुतीकरण करण्यासाठी महावितरणकडे वारंवार बैठका तसेच, पत्रव्यवहार करून संपर्क साधून देखील उक्त प्रकरणी कोणतीही कार्यवाही करण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने सदरहू विद्युत वाहिन्या व खांबांचे मजबुतीकरण करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. नितिन राऊत :** (१) व (२) हे खरे नाही. सिंहगड किल्ल्यावर जाणारी वीज वाहिनी २५ ते ३० वर्षापूर्वीची आहे. सदरील वाहिनीची गरजेनुसार आवश्यक दुरुस्ती व देखभालीची कामे वेळोवेळी केली जातात. त्यामुळे तेथे जिवितास धोका आहे अशी परिस्थिती निदर्शनास आलेली नाही.

(३) हे खरे नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## पांढरकवडा (जि.यवतमाळ) येथील केंद्रीय विशेष सहाय्य योजनेंतर्गत झालेला गैरव्यवहार

**(२३) * ७४८२ डॉ.अशोक उईके (राळेगाव) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालय (ता.पांढरकवडा, जि.यवतमाळ) मार्फत केंद्रीय विशेष सहाय्य योजनेंतर्गत सन २०१२ व २०१३ मध्ये कृषि विकास मधुन आदिवासी शेतकऱ्यांसाठी शेततळे, हळद लागवड व मोगरा लागवड करण्यासाठी निधी उपलब्ध करुन देण्यात आलेला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त कामांमध्ये प्रकल्प कार्यालयातील अधिकाऱ्यांच्या संगनमताने कंत्राटदाराने केलेल्या गैरव्यवहारची चौकशी करण्याबाबतचा प्रस्ताव मा.अप्पर आयुक्त, आदिवासी विकास, अमरावती यांच्याकडे दिनांक २३ जानेवारी, २०२० रोजी वा त्यासुमारास पाठविण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रस्तावाच्या अनुषंगाने शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, तद्नुषंगाने अनियमितता केलेल्या अधिकारी व कंत्राटदारांविरुद्ध शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. के.सी.पाडवी :** (१) खरे आहे.

(२) व (३) एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, पांढरकवडा कार्यालयाकडुन सन २०१७ मध्ये वैयक्तिक लाभाच्या हळद लागवड, फुलबाग लागवड, शेततळे खोदणे या कैंद्रिय सहाय्य योजनेअंतर्गत कामे मंजूर करण्यात आले. सदर योजना शेतक-यांसाठी वैयक्तिक देय (डीबीटी) स्वरूपाच्या असून यामध्ये कंत्राटदाराचा समावेश नाही. मंजूर योजनांमध्ये लाभार्थ्यांना ६० टक्के अग्रीम अदा करण्यात आले होते. उर्वरित ४० टक्के रक्कम वितरीत करण्याच्या अनुषंगाने प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, पांढरकवडा कार्यालयाने माहे मे-जुन, २०१९ दरम्यान मोका तपासणी

केली असता योजना राबविताना नियमानुसार कार्यवाही न झाल्याने व लाभार्थी निवड अटी व शर्तीनुसार न झाल्याने अनियमितता निदर्शनास आली आहे. त्यानुषंगाने प्रकल्प कार्यालयाने दि. १५/०६/२०१९ रोजी सहाय्यक प्रकल्प अधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली चौकशी समिती नेमून प्राथमिक चौकशी केली आहे. सदर समितीचा अहवाल अपर आयुक्त, आदिवासी विकास अमरावती यांना अधिक चौकशीकरीता सादर करण्यात आला आहे. त्यानुषंगाने अपर आयुक्त, आदिवासी विकास अमरावती यांनी सदर योजनेंतर्गत सखोल चौकशी करण्यासाठी सहाय्यक आयुक्त लेखा, आदिवासी विकास अमरावती यांच्या अध्यक्षतेखाली ४ सद्स्यांची समिती गठीत केली आहे.सदर चौकशी अहवालानुसार संबंधितांवर कारवाई करण्यात येईल.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## नाशिक जिल्ह्यातील शेतकऱ्यांचे वनहक्क कायद्यानुसार वनपट्टे नावावर करण्याबाबत

**(२४) * ४२५७ श्री.सुहास (आण्णा) व्दारकानाथ कांदे (नांदगाव) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वनहक्क कायद्यानुसार वनजमीन कसत असलेल्या नाशिक जिल्ह्यातील ५० हजाराहून अधिक शेतकऱ्यांना वनपट्टे नावावर करण्याचा निर्णय तत्कालीन शासनाने घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने ३० हजार प्रकरणे पात्र ठरवून लाभार्थ्यांच्या नावावर वनपट्टे करुन दिले असून त्यापैकी २० हजार १७४ प्रकरणे अपात्र ठरविण्यात आली आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याप्रकरणी न्यायालयाने अपात्र दाव्यांची पुनर्तपासणी करण्याचे आदेश दिले असून, यापैकी किती अपात्र लाभार्थ्यांनी वनहक्काचे सबळ पुरावे सादर केले आहेत,

(४) तसेच अपात्र दाव्यांची पुनर्तपासणी करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. के.सी.पाडवी :** (१) होय, हे खरे आहे.
(२) होय, हे अंशत: खरे आहे.
(३) व (४) याबाबत मा.सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या निर्देशाच्या अनुषंगाने जिल्हास्तरीय समितीने अंतिमत: नाकारलेले दावे व अपीलांची पुनर्तपासणी करून ती प्रकरणे पुनर्निर्णयासाठी समितीसमोर ठेवण्याबाबत दि.१८.०३.२०१९ रोजीच्या पत्रान्वये जिल्हाधिकारी यांना कळविले आहे. तसेच आयुक्त, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे यांनी दि.२५.०९.२०१९ रोजीच्या पत्रान्वये पुनर्तपासणीचे मुद्दे निर्धारित करून दिले आहेत.

सद्य:स्थितीत जिल्हास्तरीय वनहक्क समितीने अपात्र केलेल्या २० हजार १४२ दाव्यांच्या पुन: तपासणीचे कामकाज उपविभागस्तरीय वनहक्क समितीमार्फत चालू आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## टेंभुर्णी शहर (ता.जाफराबाद, जि.जालना) येथील वीज पुरवठा सुरळीत करण्याबाबत

**(२५) * ३९८५ श्री.संतोष दानवे (भोकरदन), श्री.नारायण कुचे (बदनापूर) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) टेंभुर्णी शहरातील (ता.जाफराबाद, जि.जालना) येथील रोहित्र जळाल्याने शहरातील काही ठिकाणी महिन्याभरापासून वीज पुरवठा होत नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, वारंवार मागणी करूनही वीजपुरवठा सुरळीत होत नसल्याने स्थानिक रहिवाशांनी वीज वितरण कंपनीतील अभियंता यांना माहे डिसेंबर, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, टेंभुर्णी शहरामध्ये विविध भागांत २२ ते २८ रोहित्राद्वारे वीज पुरवठा केला जातो, परंतु दत्तनगर, आंबेगाव रोड, बाजार भागातील अनेक रोहित्र वर्षभरापासून जळालेल्या अवस्थेत असुन त्यामुळे इतर रोहित्रावर विजेचा अतिरिक्त भार पडत असल्याने माहे डिसेंबर, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान नवीन रोहित्रही जळण्याचे प्रकार निदर्शनास आले आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, जवळपास सिंगल फेजची ९ रोहित्र कंपनीकडे जमा करून वर्ष पूर्ण झाले असून अद्यापी वीज वितरण कंपनीच्या तांत्रिक विभागाकडून रोहित्राचा पुरवठा होत नसल्याने नागरिकांना अंधारात राहावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, तद्नुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. नितिन राऊत :** (१) हे खरे नाही. माहे डिसेंबर, २०१९ मध्ये टेंभुर्णी शहरातील २५ के.व्ही.ए. चे चार व ६३ के.व्ही.ए.चे एक रोहित्र जळाले होते. सदर नादुरुस्त रोहित्रे महावितरण कंपनीकडून ताबडतोब दुरुस्त करुन बदलण्यात आली होती.

(२) हे खरे आहे. माहे डिसेंबर, २०१९ मध्ये टेंभुर्णी शहरातील नादुरुस्त रोहित्र बदलण्याचे काम प्रगतीपथावर असतानाच स्थानिक नागरिकांनी शाखा कार्यालयात दिनांक २३.१२.२०१९ रोजी निवेदन दिले होते.

(३) व (४) टेंभुर्णी शहरातील (तालुका जाफ्राबाद, जि.जालना) वीज ग्राहकांची एकूण संख्या २९०९ इतकी आहे. सदर शहरास थ्री फेज २०० के.व्ही.ए.चे ३ रोहित्रे, ६३ के.व्ही.ए.चे १ रोहित्र व सिंगल फेज २५ के.व्ही.ए.च्या ४५ रोहित्रांद्वारे वीज पुरवठा करण्यात येत आहे. जानेवारी महिन्यात आंबेगांव रोड व बाजार भागातील सिंगलफेजचे एकूण ९ रोहित्रे नादुरुस्त झाले होते. त्यापैकी दिनांक १८.०२.२०२० पर्यंत ६ रोहित्रे दुरुस्त करुन बसविण्यात आले आहेत. उर्वरित रोहित्रांवरील ग्राहकांचा वीज पुरवठा पर्यायी व्यवस्था म्हणून जवळील दुसऱ्या रोहित्रावरुन पूर्ववत करुन देण्यात आला आहे. उर्वरित ३ रोहित्रे दुरुस्त करुन बदलण्यात येत आहेत.

(५) अनधिकृत वीज भारामुळे रोहित्र अतिभारीत होऊन नादुरुस्त होऊ नये, तसेच विजेचा गैरवापर होऊ नये म्हणून टेंभुर्णी शहरात १ कि.मी. एअरबंच केबल टाकण्याचे काम जिल्हा नियोजन व विकास कामांतर्गत प्रगतीपथावर आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## पुसद वनपरिक्षेत्र अंतर्गत (जि.यवतमाळ) वाघजाळी येथे महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेत झालेला गैरव्यवहार

**(२६) * ६४६१ श्री.नरेंद्र भोंडेकर (भंडारा) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुसद वनपरिक्षेत्र अंतर्गत (जि.यवतमाळ) मारवाडी वनक्षेत्रात बेलोरा बिट कक्ष ३८२ वाघजाळी येथे महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेतून दगडी बांधाची (एल.बी.एस.) कामे करून १०५ दगडी बांध टाकून त्यापैकी ५० च्या वर दगडी बांध पूर्वीचेच जुने असून नवीन दगड व उंची तसेच लांबी वाढवून आणि घनमीटर वाढवून त्या कामावर प्रत्यक्षात काम न करता बोगस मजुरांच्या नावे हजेरी पट नोंदवून मजुरीची रक्कम वनविभागाच्या कर्मचाऱ्यांनी हडप केल्याची तक्रार उपजिल्हाधिकारी (रो.ह.यो.) जिल्हा यवतमाळ यांना दिनांक ७ जानेवारी, २०२० रोजी वा त्या सुमारास श्री.महेश नाईक (यवतमाळ) जिल्हा सदस्य रोजगार हमी योजना यांनी केलेली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी नवीन बांधाची लांबी व रुंदी अत्यंत कमी असून प्रत्यक्षात जागेवर काम कमी केले आहे, तसेच मोजमाप पुस्तिकेत व अंदाज पत्रकाप्रमाणे बनावट नोंद घेवून मर्जीतल्या बोगस मजुरांच्या नावे देयके अदा करण्यात आली आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी जि.पी.एस. मधील नोंदीप्रमाणे चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व प्रत्यक्षात कामाच्या ठिकाणची अंदाज पत्रकातील व मोजमाप पुस्तिकेतील तफावतीची सखोल चौकशी करण्यात आली आहे काय त्यात काय आढळून आले, तद्नुसार दोषींविरुद्ध कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संजय राठोड :** (१) हे खरे आहे.

(२) व (३) सहायक वनसंरक्षक (जंकास व कॅम्पा) पुसद यांचेमार्फत प्राथमिक चौकशी करण्यात आली असून दि. ०२/०३/२०२० रोजी उपवनसंरक्षक, पुसद वनविभाग यांना अहवाल सादर केला आहे. सदर अहवालानुसार कक्ष क्र.३८२

मध्ये कोणतेही नवीन काम न करता कामाची रक्कम खर्ची घालणे, कामाची मोजमापे न घेता ढोबळमानाने मजुरी अदा करणे, जबाबदार अधिकाऱ्यांनी मोजमाप न घेणे, कामावर देखरेख न ठेवणे, कामावर न आलेल्या लोकांच्या बँक खाती रक्कम जमा करणे इ. अनियमितता झाल्याचे दिसून येते.

सदर प्राथमिक चौकशी अहवालानुसार वनक्षेत्रपाल (प्रादेशिक) मारवाडी, क्षेत्र सहायक बेलोरा व वनरक्षक, बेलोरा हे सकृतदर्शनी दोषी आढळून आले असून त्यांना निलंबित करण्यात आले आहे व त्यांचेविरुध्द शिस्तभंगविषयक कार्यवाही सुरु करण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## एकात्मिक आदिवासी प्रकल्प किनवट (जि.नांदेड) अंतर्गत आदिवासी वसतिगृहांकरिता पुस्तके पुरवठयामध्ये झालेला गैरव्यवहार

**(२७) * ६८२८ श्री.बालाजी कल्याणकर (नांदेड उत्तर) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) एकात्मिक आदिवासी प्रकल्प किनवट (जि.नांदेड) अंतर्गत कार्यरत असलेल्या १५ शासकीय आदिवासी वसतिगृहांकरिता पुस्तके पुरवठा करण्यासाठी जिल्हा ग्रंथालय अधिकारी यांना सहा.जिल्हाधिकारी तथा प्रकल्प अधिकारी यांनी दिलेल्या आदेशानुसार खरेदी केलेल्या पुस्तकांच्या मूळ किंमतीवरच अधिकच्या किंमतीचे स्टीकर्स लावून अपहार केल्याची बाब माहे फेब्रुवारी, २०२० मध्ये वा त्यादरम्यान आदिवासी विकास निरिक्षकांच्या तपासणी अहवाल निष्पन्न झाले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, तदनुषंगाने संबंधित दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. के.सी.पाडवी :** (१) होय, हे खरे आहे.

(२) एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, किनवट अंतर्गत येणाऱ्या १५ शासकीय आदिवासी वसतीगृहांना स्पर्धा परीक्षेची पुस्तके पुरविण्याबाबत

जिल्हा ग्रंथालय अधिकारी, नांदेड यांना प्रती वसतीगृह रुपये २.०० लक्ष या प्रमाणे रुपये ३०.०० लक्ष रुपयांची पुस्तके पुरविण्याबाबत दिनांक १८.९.२०१९ रोजीच्या आदेशान्वये कळविण्यात आले होते. जिल्हा ग्रंथालय अधिकारी, नांदेड यांनी संबंधित वसतीगृहांना पुस्तकांचा पुरवठा केला असून त्यांना रुपये ३०.०० लक्ष इतका निधी वितरीत केला आहे.

संबंधित वसतीगृहास पुरवठा केलेल्या पुस्तकांची तपासणी आदिवासी विकास निरीक्षक यांच्यामार्फत करण्यात आली असून सदर तपासणीत पुरवठा केलेल्या काही पुस्तकांच्या मुळ किंमतीवर वाढीव किंमतीचे स्टीकर लावण्यात आलेले असल्याचे आढळून आले. तपासणी अहवालाच्या अनुषंगाने वाढीव किंमतीच्या तफावतीची रक्कम संबंधित पुरवठादार यांच्याकडून रुपये ८६,२५०/- परत करण्याबाबत जिल्हा ग्रंथालय अधिकारी, नांदेड यांना कळविण्यात आले. त्या अनुषंगाने जिल्हा ग्रंथालय अधिकारी, नांदेड यांनी दिनांक २०.२.२०२० रोजी सदर तफावतीची रक्कम रुपये ८६,२५०/- एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, किनवट या कार्यालयात जमा केलेली आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## आदिवासी विभागातील वसतीगृहाकरिता खरेदी केलेल्या फर्निचर खरेदीमध्ये झालेला गैरव्यवहार

**(२८) * ७४८५ श्री.देवेंद्र भुयार (मोर्शी) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आदिवासी विभागातील आश्रमशाळा वसतीगृहाकरिता फर्निचर खरेदीमध्ये ३७३ कोटी रुपयांचा गैरव्यवहार झाला असल्याचे दिनांक ७ ऑगस्ट, २०१९ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नागपूर विभागातील स्पॅसेवुड कंपनीचा वर्गातील बेंच चा दर ४७२० रुपये इतका असून तोच बेंच ठाणे येथील गोदरेज कंपनीने ११२३२ रुपयाचा दर लावला असून, इतर सर्व खरेदी केलेल्या वस्तूंच्या दरांमध्ये तफावत असल्याचे देखील निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, तद्नुषंगाने संबंधितांवर कारवाई करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. के.सी.पाडवी :** (१) हे खरे नाही.
(२) व (३) राज्यामध्ये आदिवासी विभागांतर्गत ४९८ शासकीय आश्रमशाळा व ४९४ शासकीय वसतीगृहे सुरु आहेत. शासकीय आश्रमशाळेमध्ये भौतिक सुविधा बेड, डेस्क, बेंच, टेबल इ. नसणे याबाबत अनेक न्यायालयीन प्रकरणे, राष्ट्रीय मानवधिकारी आयोग, विधान मंडळ समित्या यामध्ये शासनास सूचना व निर्देश प्राप्त झालेले आहेत. आदिवासी विकास विभागाच्या आश्रमशाळांच्या दुरावस्थेबाबत काही वर्षापासून सातत्याने विविध स्तरावरुन चर्चा होत होती. हे चित्र बदलून आश्रमशाळामधील विद्यार्थांना उत्तमाउत्तम सुविधा उपलब्ध करुन देण्यासाठी आदिवासी विकास विभागामार्फत मिशन कायापालट हे अभियान राबविण्यात आले. सदर कायापालट अभियानांतर्गत १२५ पथकांनी शासकीय आश्रमशाळा व शासकीय वसतीगृहामधील सर्व भौतिक सुविधांची तपासणी करुन मागणी निश्चित केली. मोठया प्रमाणावरील खरेदी पाहता आदिवासी विकास विभागाने प्रसार माध्यमाद्वारे जाहीरात देऊन निविदापूर्व बैठकीकरिता इच्छुक विक्रेत्यांना दिनांक २९/१२/२०१८ रोजी आमंत्रित केले होते. सदर बैठकीस सुमारे ४० विक्रेत्यांचे प्रतिनिधी उपस्थित होते. दुर्गम आणि डोंगराळ भागातल्या ठिकाणी फर्निचर पुरवठा करण्यासोबतच त्यानंतरच्या दुरुस्तीची सुविधा पुरविण्याची क्षमता असलेला उत्पादक पुरवठादार उपलब्ध होण्याच्या अनुषंगाने त्याप्रमाणे निविदा निकष ठरविण्यात आले. सदर निविदा प्रक्रियेसाठी दोन वेळा निविदा मागविण्यात आल्या. वरील खरेदी प्रक्रिया राष्ट्रीय स्तरावरील वाणिज्य विभागाच्या GeM पोर्टलवर पारदर्शकपणे व मानवी हस्तक्षेप विरहित आणि खरेदी धोरणातील तरतुदीस अनुसरुन पार पाडण्यात आलेल्या आहेत.

नागपूर व अमरावती या विभागासाठी दोन निविदाधारक गोदरेज व स्पेसवूड पात्र ठरले. ठाणे व नाशिक या विभागासाठी स्पेसवूडने निविदा भरली नव्हती. त्यामुळे गोदरेज यांची निविदा L-१ असून ती निविदा पात्र ठरली. नाशिक विभागासाठी गोदरेज तर्फे सर्व वस्तुंवर सरासरी

बाजारभावाच्या तुलनेत २२.५ टक्के तर ठाणे विभागासाठी २७ टक्के कमी दर नमुद केले तर स्पेसवुड यांनी अमरावती विभागासाठी ५१ टक्के व नागपूर विभागासाठी ५४ टक्के कमी दराच्या L-१ निविदा प्राप्त झाल्या.

प्रत्येक विभागासाठी स्वतंत्र निविदा असल्याने तांत्रिकदृष्टया पात्र निविदाकाराची निविदा L-१ म्हणून प्रत्येक विभागात निवडण्यात आली. प्रत्येक विभागासाठी पुरवठादार व ब्रँड वेगळे आहेत. फर्निचरच्या सर्व प्रकारच्या वस्तूचे नमुने प्राप्त करुन घेऊन तज्ञ सल्ला तसेच प्रयोगशाळा तपासणीच्या माध्यमातून गुणवत्तेची खात्री केल्यावरच विभागामार्फत पुढील कार्यवाही करण्यात आली आहे. सदर प्रक्रियेसंदर्भात उद्योग विभागानेही सहमती दर्शविलेली आहे. सदर प्रकरण न्यायप्रविष्ट आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## पेण (जि.रायगड) तालुक्यातील शेतकऱ्यांना शेतीची बांधणी व दुरुस्तीकरीता निधी उपलब्ध करुन देण्याबाबत

**(२९) * २०५३ श्री.रविशेठ पाटील (पेण) :** सन्माननीय **खार जमिनी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पेण (जि.रायगड) तालुक्यात सन २०१९ मध्ये झालेल्या अतिवृष्टीमध्ये नारवेल-बेनवले, वाशी-वडांगी, शिर्की-वाशी, वावे-वडखळ, सोनखार-उर्णोली, रावे, दुतर्फा कोपर, जीते, नगदी-सापोली, पाटखार, जुई-अब्बास, माचेला-चिरबी, गांधेचोळे या गावातील शेतीसंरक्षक बंधारा वाहुन गेल्याने समुद्राचे खारे पाणी शेतात शिरुन शेतीचे अतोनात नुकसान झाले असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी स्थानिक शेतकऱ्यांनी स्वत:ची शेती वाचविण्यासाठी काही बंधाऱ्यांची दुरुस्ती व बांधणी केली असून त्यांना योग्य आर्थिक मोबदला देण्यात आलेला नाही, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच, नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना शेतीचे बंधारे दुरुस्ती व बांधणी करण्यासाठी आर्थिक मदत मिळाली नसल्याने त्यांना आवश्यक निधी उपलब्ध करुन देण्याबाबत लोकप्रतिनिधी यांनी मागणी केली केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, तद्नुषंगाने उक्त गावातील शेतकऱ्यांना आर्थिक मदत मिळण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विजय वडेट्टीवार :** (१) होय.
(२) लाभधारकांनी केलेल्या दुरूस्तीचा मोबदला देणे अनुज्ञेय नाही.
(३) होय.
(४) झालेल्या नुकसानीची पहाणी क्षेत्रियस्तरावर करण्यात आलेली आहे. तसेच लोकप्रतिनिधींनी मागणी केल्यानुसार नादुरुस्त बंधारे दुरुस्त करण्यासाठी निधीच्या मागणीचा प्रस्ताव माहे फेब्रुवारी, २०२० मध्ये शासनास प्राप्त झाला असून सदर प्रस्ताव तपासून पुढील कार्यवाही करण्यात येत आहे.

तसेच सन २०१९-२० मध्ये पेण तालुक्यातील मंजूर प्रापणसूचीनुसार रु.१.४८ कोटी इतक्या रक्कमेच्या १३ योजनांची मजबुतीकरणाची कामे हाती घेण्यात येत आहेत.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## कमलापूर (ता.पूर्णा, जि.परभणी) येथील पारधी वस्तीमध्ये ठक्करबाप्पा वस्ती सुधार योजनेतून वीज पुरवठा करण्याबाबत

**(३०) * १९४७ डॉ.राहूल पाटील (परभणी) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कमलापूर (ता.पूर्णा, जि.परभणी) येथील पारधी वस्तीवर ठक्करबाप्पा वस्ती सुधार योजनेतून वीज पुरवठा देण्याची मागणी गत १५ वर्षांपासून स्थानिक आदिवासी बांधव करीत आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर मागणीच्या अनुषंगाने वीज पुरवठा करण्याकडे प्रशासन दुर्लक्ष करीत असल्याने दिनांक २३ जानेवारी, २०२० पर्यंत याबाबत निर्णयात्मक कार्यवाही न झाल्यास प्रजासत्ताक दिनी बहिष्काराचा इशारा ग्रामपंचायत कार्यालयाकडून आदिवासी विकास प्रकल्प कार्यालयाला देण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहु प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने संबधित अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) तसेच सदर गावातील पारधी वस्तीला वीज पुरवठ्यासह इतर मुलभूत सुविधा उपलब्ध करून देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. के.सी.पाडवी :** (१) हे खरे नाही.

(२) याबाबतचे निवेदन हे ग्रामपंचायतकडुन जिल्हाधिकारी कार्यालय, परभणी येथे देण्यात आलेले आहे.

(३), (४) व (५) सदर वस्तीला वीज पुरवठा देण्याबाबतचा प्रस्ताव गटविकास अधिकारी, पंचायत समिती, पुर्णा यांचेमार्फत सन २०१९-२० मध्ये प्रकल्प कार्यालयास प्रथमच सादर करण्यात आलेला होता. सदर प्रस्तावाच्या अनुषंगाने जिल्हाधिकारी, परभणी यांनी दिनांक १३ फेब्रुवारी, २०२० रोजीच्या आदेशान्वये वीज पुरवठा करण्याकरिता रु. ७.०० लक्ष निधीच्या कामास प्रशासकीय मान्यता देण्यात आलेली आहे. तसेच सदर गावामध्ये आवश्यक असलेल्या अन्य सोई सुविधा पुरविण्यासाठी एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, कळमनूरी या कार्यालयाकडून संबंधित यंत्रणांकडून प्रस्ताव मागविण्यात आलेले आहेत.

-----------------

**विधान भवन :** **राजेंद्र भागवत**
**मुंबई.** **सचिव (कार्यभार),**
**महाराष्ट्र विधानसभा**

---

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.